साप्ताहिक लोकप्रभा

लोकसत्ता
२ ऑक्टोबर २००९

मुखपृष्ठ
तथ्यांश
फॉरवर्ड
तथास्तु
पडघम
कव्हरस्टोरी
दसरा विशेष
शेतकी
माइण्ड ओव्हर मॅटर
बखर संगणकाची
मेतकूट
पर्यटन
अल्केमिस्ट्री
प्रयोग
आरोग्य
घरचा शेफ
रॉक ऑन
संवाद
प्रतिक्रिया
संशोधन
प्रशिक्षण
शक्तिपीठ
वित्तं - बातमी
चित्रदृष्टी
गॉसिप
आपलं बुवा असं आहे!
थरारक निसर्ग
वाचक प्रतिसाद
भविष्य
संपर्क
मागील अंक

Advertise with us

अल्केमिस्ट्री

माझ्या आयुष्यातल्या मला शुभंकर वा भयंकर वाटणाऱ्यांसोबत माझी अशीच अल्केमिस्ट्री जुळून जाते. तीच अल्केमिस्ट्री मी लोकप्रभाच्या वाचकांसाठी आणतोय. या अल्केमिस्ट्रीत जी माणसं तुम्हाला भेटतील त्यांनी माझ्या आयुष्यावर प्रयोग केलेत. मीही त्यांच्या आयुष्यावर प्रयोग केलेत. पण आम्ही नेहमीच एकमेकांना भेटलोय असं नाही.

राजू परुळेकर

उद्धव (मर्द) ठाकरे

नारायण राणे यांनी जेव्हा शिवसेना नेतेपदाचा राजीनामा दिला तेव्हा ताज लँड्स इनच्या एका आरक्षित सूइटमध्ये बसून मी आणि उद्धव ठाकरे सहारा मुंबई चॅनलवर त्यांची वक्तव्यं आणि दृश्यं पाहत होतो. उद्धव वरवर दाखवत नसला तरी आतून खूप डिस्टर्ब होता. स्वाभाविक होतं. पुढे काय होईल याचा संपूर्ण नसला तरी सर्वसाधारण अंदाज त्याला होता. तिथे त्याला मोबाईलवर पहिला फोन सूर्यकांत महाडिकांचा आला. उद्धव फोनवर म्हणाला, ''मी मर्द आहे. बाळासाहेबांचा मुलगा आहे. तुम्ही काळजी करू नका.'' पुढे ''मी मर्द आहे'' आणि ''उद्धव बाळासाहेब ठाकरे आहे'' अशी वाक्यं उद्धवने फोनवर उच्चारली. महाडिकांना त्या बाजूला किती विश्वास वाटला कुणो ठाऊक? परंतु उद्धव स्वत: स्वतला बसलेला धक्का चेहऱ्यावर न दाखवण्याची पूर्ण काळजी घेत होता. त्या घटनेच्या अगोदर मातोश्रीवरचं आणि उद्धवचं वागणं आजच्यासारखं नव्हतं. कार्याध्यक्षपद त्याने बरंचसं लाइट्ली घेतलं होतं. तो बहुतेक कुणाचेही (पक्षातल्यांचेही) फोन घेत नसे. फारसा कुणालाच भेटत नसे. उद्धवशी संपर्क साधू इच्छिणाऱ्या

प्रत्येकाला मिलिंद नार्वेकर फोनवर येऊन अत्यंत अपमानजनक शब्दांत त्याची बोळवण करत असे. (आजही बऱ्याचदा करतो, पण आता जरा कमी) शिवाय इतरही अनेक न लिहिण्याजोग्या गोष्टी होत्याच. दुसऱ्या दिवशी बाळासाहेबांनी रंगशारदामध्ये मीटिंग घेऊन नारायण राणेंना पक्षातून काढलं. तेव्हा त्या अत्यंत गुंतागुंतीच्या काळात संजय राऊत अमेरिकेत होता. तिथे तो थोडासा आजारीही होता. त्याचे मला फोन येत. उद्धवला या कठीण प्रसंगात मी मदत करावी, अशी त्याची विनंती होती. राजशी माझे घनिष्ठ मैत्रीचे संबंध असले तरी उद्धवशी माझे संबंध कधीच वाईट नव्हते. तो आजतागायत माझे फोन उचलत आलेला आहे किंवा निरोप ठेवला तर त्याचे उलट फोन मला येतात. खुद्द मिलिंद नार्वेकर आणि माझे संबंधही वाईट नव्हते. मिलिंद तर माझ्याकडे गाडी नव्हती तेव्हा मला स्वतच्या गाडीने घरी सोडायला अनेकदा आलेला आहे.

नारायण राणे प्रकरणात मी उद्धवमागे शंभर टक्के उभं राहायचं ठरवलं. याचं कारण संजयची विनंती नव्हती, तर तात्त्विकदृष्टय़ा मला नारायण राणेंचं बंड शंभर टक्के चुकीचं वाटत होतं. शिवाय त्यांना राजकारणाच्या सारीपाटावरचं बुध्दीबळ खेळण्यापेक्षा बोलण्याद्वारे आणि काही प्रमाणात रस्त्यावरचं बॉक्सिंगच प्रिय होतं. याला मुख्यमंत्री विलासराव देशमुखांची तेव्हा फूस होती. नंतर त्यांना राणेंच्या झळा बसल्यावर मी तात्त्विकदृष्टय़ा बरोबर होतं हे पटलं. आता ते खुद्द राणेसाहेबांनाही पटायला हरकत नाही.

नारायण राणेंविरुद्धच्या पोटनिवडणुकीत उद्धवने नंतर अख्खी शिवसेना कोकणात उतरवली. मी 'सामना'तून तेव्हा रिपोर्ताज लिहिणं सुरू केलं. राणेंची कणकवली-मालवण परिसरातली दहशत किती जबरदस्त आणि परिणामकारक आहे व त्यापुढे संपूर्ण शिवसेना कशी हतवीर्य आहे हे मी त्यात लिहीत होतो. कणकवलीत मी राजसोबत हॉटेलमध्ये राहिलो होतो. दिवसभर मतदारसंघात फिरून मी सकाळी माझे लेख लिहीत असे. त्याचा गौरवपर उल्लेख बाळासाहेबांनी माझ्या नावासकट त्यांच्या कुडाळच्या पत्रकार परिषदेतही केला होता. अर्थात त्यांच्यावर उलटल्यावर राणे दहशतवादी असल्याचा त्यांना साक्षात्कार झाला होता. त्यांनी आयुष्यभर जे पेरलं तेच कोकणात उगवताना मी पाहिलं. आज जे शिवसेनेचे दिग्गज, लढाऊ नेते मानले जातात ते तेव्हा राणेसमर्थकांची एक सुमो गाडी मागे लागली तरी आपल्या सहासात सुमो आहेत हे विसरून एक्सलेटरवर उभे राहून वेगात पळत सुटायचे. शिवसेना म्हणजे आक्रमकपणा नसून न्यूनगंडातून आलेला उद्दामपणाचा आविष्कार आहे, ही माझी जी आधीपासूनची थिअरी होती त्याची लिटमस टेस्ट कोकणात पाहिली.

उद्धवशी त्या काळात माझं दिवसातून दहा-दहा वेळा बोलणं व्हायचं. रश्मी वहिनींचा दोन-तीनदा खुशाली विचारणारा फोन यायचा. त्यातच त्या काळात मी 'सकाळ'मध्ये शिवसेनेची पडझड आणि धडपड असा लेख लिहिला. त्यातली वस्तुस्थितीला धरूनची टीका झोंबल्याने खुद्द बाळासाहेबांनी मला रात्री साडेनऊला फोन केला. त्यातले प्रमुख मुद्दे- १. तू दादूला (उद्धवला) भावाप्रमाणे असताना असं का लिहितोस? २. तुझा आता वैचारिक सुंता झालेला आहे का? ३. तुझ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर माझ्याकडे आहे. शिवसेनेचं वय जेवढं आहे तेवढं तुझं वयही नाही. तू माझ्यासमोर बस. मी तुझ्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर देईन. अर्थातच ती वेळ पुढे कधीच आली नाही. उलट ''राजची (राज ठाकरे) खरंच आम्ही कोंडी करतोय का?'' असा प्रश्न रश्मी ठाकरेंनी मला विचारला. उद्धव व माझ्या मैत्रीपर्वात मी त्यांना हवं ते उत्तर देईन अशी कदाचित त्यांना आशा असावी. मी म्हटलं, ''शंभर टक्के. तुम्ही राजची प्रचंड मानसिक, राजकीय कोंडी केलेली आहे. त्याची किंमत एक ना एक दिवस शिवसेनेला चुकवावी लागेल.'' त्यानंतर उद्धव वगळता त्याच्या कुटुंबियांनी या खऱ्या उत्तराच्या मोबदल्यात माझ्याशी संबंध तोडून टाकले. मला खरेपणाची किंमत चुकवायला मजा येते. खोटेपणाला मी फाटय़ावर मारतो. माझ्या उत्तराचा खरेपणा पुढे शिवसेना अनुभवतेच आहे. याच काळात आदित्य नि मी गप्पा मारत बसलेलो आहे. मातोश्रीवर त्याने त्याचे आवडते नेते हिटलर, चर्चिल आणि जॉर्ज डब्लु. बुश (ज्यु.)आहेत, असं सांगितलं होतं असं स्मरतं. तो काय वाचू? असं विचारत असे. मी त्याला हेन्र्री किसिंजरचा 'डिप्लोमसी' हा ग्रंथ वाचायला सांगितला होता. पण ज्या वयात तो स्टेजवर येऊ पहातोय ते पहाता तो ग्रंथ त्याने वाचला नसावा! उद्धव बाळासाहेबांहून एकदम वेगळा आहे. त्याच्या पोटात महाराष्ट्राबद्दल आगच नाही. माझे त्याचे मतभेदाचे मुद्दे जे होते त्यातला एक मुद्दा तो संजय निरुपम ते अनेक प्रकारचे भैय्यांचे लांगुलचालन करतो तो होता. हा मुद्दा राजने खूप नंतर घेतला. अक्षर दिवाळी २००३च्या अंकात मी त्यावर सविस्तर लिहिलंय. माझ्या 'आयडियाज आर डेंजरस' या पुस्तकात 'शिवसेना: भासमान आणि वास्तविक' या नावाने तो प्रसिध्दही झालाय. दुसरा एक मतभेदाचा मुद्दा होता तो १९९३च्या दंगलीत मराठी मुलं मलबार हिल ते दहिसर रस्त्यावर उतरली. हिंदुत्वाचं लेबल लावून त्यांचं माथं फिरवण्यात आलं. त्यात विशिष्ट समाजाच्या बिल्डरांनी मुंबईतल्या मोक्याच्या मराठी-मुस्लिम जमिनी मोकळ्या करून घेतल्या. मग त्या इमारती शाकाहारी घोषित करून त्यात मराठी माणसांना घरं नाकारत मुंबई अमराठी करण्याचा आपला बेत रक्ताचा थेंबही न सांडता तडीस नेला. खुद्द उद्धव व बाळासाहेब त्या शोषक समाजाच्या पूर्ण आहारी गेले. मराठी मुलं ९३च्या केसेसच्या डेट्सना अजून कोर्टात जातात. उद्धव तर त्या विशिष्ट समाजाच्या धर्मगुरूंचा शिष्य झालाय. बाळासाहेब स्वत शाकाहारी झाले. (हल्ली पुन्हा चिकन खातात म्हणे..) बनिया-भैय्यांची ही युती मराठी मुंबईला गिळत असताना कोणता मर्द मराठी माणूस गप्प बसेल. उद्धव गप्प बसला. एवढंच नव्हे तर आपल्या पक्षातल्या बाळा काळसेकरसारख्या याविरुध्द बोलणाऱ्या व आंदोलन करणाऱ्यांना त्याने दम देऊन चूप केले. आजही हे चालू आहे. शिवसेना नगरसेवक संजय पोतनीस व कृपाशंकर सिंह यांचे साटेलोटे आहे. याचे सर्व कागद माझ्याकडे पूर्ण पुराव्यानिशी आहेत. हे सारं काय उद्धवच्या संमतीशिवाय आहे? (त्यातल्या कृपाशंकर -पोलीस अजगरी पध्दतीने गिळत असलेल्या संस्थेचा मीच अध्यक्ष आहे, आता बोला!) मराठी माणसाविषयी व मराठी मुंबईविषयी आत्मीयता ही मराठी माणसाला असणं हे किती नैसर्गिक आहे हे उद्धवला अनेकदा सांगूनही तो त्याने ठरवलेल्या मार्गानेच जातो. एक साधं उदाहरण सांगतो. उत्तर मुंबई भागात प्रचंड प्रमाणात बिहारी सिक्युरिटी एजन्सीजचं पेव फुटल्याचं उदाहरणासहित मी उद्धवला सांगितलं. (हे सारं राजच्या आंदोलनानंतर) तर तो म्हणाला, तुला आता मिलिंदचा फोन येईल. तो आला. करतो. बघुया. इतकं सोपं नाही. वगैरे सांगून मिलिंदने फोन ठेवला. बिहारी राहिले आनंदात. जसे टॉवर बांधून विशिष्ट जमातीचे लोक अब्जाधीश बनून उद्धवच्या हिंदुत्वाच्या जिवावर आनंदात राहतात. आता उद्धवला जो मराठीचा कळवळा आला त्यात या बनियांना अस्सल कोळ्यांच्या मुंबईतून मांसाहारी म्हणून मराठी माणसाला हद्दपार करण्याच्या कृतीला (म्हणजे कॉल हिम अ डॉग अॅण्ड किल हिम) जाब विचारण्याची हिंमत आहे काय? ती नसेल तर मुंबई मराठी माणसाच्या हातातून गेलीच. गेली कित्येक वर्षे मी उद्धवला हेच सांगतोय. त्यावरूनच मी त्याच्यावर टीका करतोय. पण त्याच्यात बदल नाही.

मध्यंतरी एका भाषणात उद्धव तब्बल पाच वेळा 'मी मर्द आहे' असं म्हणाला. हे विचित्रच होतं. तो राजकीयदृष्टय़ा काही तरी सिध्द करायला धडपडतोय याचंच ते लक्षण होतं. त्याची समस्या ही आहे की, जे त्याला सिध्द करायचं आहे ते करणं त्याला शक्य नाही. कारण त्याचे आणि त्याच्या संघटनेचे हितसंबंध हे संपूर्णत तो जे सिध्द करू इच्छितो त्याच्या विरोधात आधीच खूप खोल गेलेत. उद्धवने पोलादी इच्छाशक्ती दाखवली असती तर मराठी माणसांनी त्याला आपला मानला असता. आता त्याला फक्त बाळासाहेबांचा मुलगा मानतात. हा उद्धवचा विजय नसून पराभव आहे, हे सांगायची त्याच्याभोवतीच्या कुणाचीही हिंमत नाही. कारण सगळेजणच मराठीविरोधी जाणाऱ्या आर्थिक हितसंबंधांच्या दलदलीत पूर्णपणे रुतलेले आहेत. उद्धवच्या बाबतीत मी एवढंच म्हणेन की, संधी मिळूनही ही मिस्ड द बस!

बऱ्याचदा उद्धव व त्याच्या मातोश्रीवरच्या कुटुंबियांना असं वाटतं की, मी त्याच्याबद्दल सारं राज व माझ्या मैत्रीच्या संदर्भात लिहितो. हे शंभर टक्के असत्य आहे. सत्य मी स्वत:लाही फाटय़ावर मारून लिहितो. राजने मराठीचा मुद्दा पुन्हा जिवंत केला हे खरं आहे, पण या मुद्याची आणि चुलतभावांच्या भांडणाची मी विचारात कधीच गल्लत करत नाही. भाषण करताना राज उद्धवपेक्षा खूप पॉलिटिकली करेक्ट असतो यात वादच नाही. पण हे राजचा शत्रूही मान्य करेल. त्याला मी कशाला हवा? राजला त्याचा 'मी' सापडलाय. उद्धव अजून चाचपडतोय. स्वतचा 'मी' हा हिंदुत्वात नसतो, मराठीत नसतो, स्वतच्या बापात नसतो, आईत नसतो. स्वतध्चा 'मी' हा आत्मिक प्रेरणेने लागलेल्या पोटातल्या आगीत असतो. तो 'मी' बोलून दाखवायला लागत नाही. चालताना, बोलताना, वागताना त्याची धग समोरच्याला जाणवते. तो 'मी' उद्धवला ज्या दिवशी सापडेल त्या दिवशी तो 'मी मर्द आहे' यासारखी पॉलिटिकली इनकरेक्ट वाक्यं बोलणार नाही.

'उद्धव बाळासाहेब ठाकरें'ना 'मी' सापडो. मग नावातलं मधलं 'बाळासाहेब' लावलं नाही तरी त्यानं काही फरक पडणार नाही. मुख्य म्हणजे याचा राजशी काही संबंधच नाही!

lokprabha@expressindia.com